दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : १४३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शनिवार, दि.०४ जानेवारी २०२५





# सासुरवाडीला गेला अन अनर्थ झाला!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, बुलडाणा :** पत्नीला आणायला गेलेल्या लोणार (जिल्हा बुलढाणा) येथील युवकाची पालघर शहरात क्रूरपणे हत्या करण्यात आली. केवला मोबाईल आणि जवळील पैसे दिले नाही म्हणून दोन अट्टल गुन्हेगारांनी त्याचे जीवन संपविल्याचे तपासात निष्पन्न झाले. यामुळे पालघर सर लोणार मध्ये खळबळ उडाली आहे.

लोणार तालुक्यातील येवती या गावातील या युवकाचा पालघर येथे उपचारा दरम्यान मृत्यू झाला. सदर युवकास दोन आरोपींनी चाकूचे वार करुन जखमी केले होते. ही घटना गुरुवारी १ जानेवारी रात्री घडली. मृतक युवकाचे नाव महादेव घुगे (वय ३० ) असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले आहे. प्राप्त माहिती नुसार येवती येथील युवक महादेव घुगे यांचे दोन महिन्यापूर्वीच पालघर मधील खानपाडा येथील एका युवतीशी लग्न झाले होते. विवाहानंतर पत्नीची प्रकृती बिघडल्याने ती काही दिवसासाठी माहेरी गेली होती. तिला परत आणण्यासाठी




महादेव नव्यावर्षात सासरी पोहचला होता. रात्री जेवन झाल्यावर महादेवने आपल्या सासु व सासऱ्याला आपण फेरफटका मारण्यासाठी बाहेर जात असल्याचे सांगितले.

दरम्यान महादेव फिरत फिरत शहरातील हुतात्मा स्मारक (स्तंभ) परिसरात पोहचला. यावेळी परिसरात आधीच उपस्थित असलेले अनीस खान( वय २५ )व राजू वाघारी (वय २३) या दोघांनी महादेवला हटकले. यावेळी दोघांनी महादेवला चाकूचा धक दाखवत त्याच्या जवळील रक्कम व मोबाइल मागितला. महादेवने नकार दिल्याने दोघांनी महादेव सोबत वाद घातला.यावेळी रागाच्या भारत दोन्ही आरोपींनी चाकूने सपासप वार केल्याने महादेव गंभीर जखमी झाला. त्याच अवस्थेत महादेवने कसेबसे पोलिस ठाणे गाठले.

पोलिसांनी त्याला जखमी अवस्थेत प्रथम पालघर येथे भरती केले, परंतू महादेव अत्यावस्थ असल्याने त्याला पुढील उपचाराससाठी सिल्वासा येथील रुग्णालयात भरती करण्यात आले. या ठिकाणी गुरुवार २ जानेवारी रात्री म हादेवचा उपचारा दरम्यान मृत्यु झाला. या प्रकरणी पालघर पोलिसांनी अनीस खान व राजू वाघारी या दोन्ही आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करत अटक केली आहे.

या हात्ये प्रकरणी पोलिसांनी हुतात्मा स्तंभ परिसरातून राजू वाघारी याला तर घटनास्थळावरुन पसार झालेल्या अनीस खान यास भोईसर येथील गांधीपाडा मधून अटक केली. दोन्ही आरोपी हे अटटल गुन्हेगार असून त्यांच्यावर यापूर्वी देखील अनेक गंभीर गुन्हे दाखल आहे. पोलिस उपअधिक्षक सतीश धाराशीवकर, पालघरचे ठाणेदार अनंत पराड यांनी ही माहिती दिली.

## दिवा प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्तांवर हल्ला ! पोलिसांनी दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले...

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०३, शिळफाटा (ठाणे) :** २ जानेवारी २०२५ रोजी दुपारी २:१५ च्या सुमारास ठाणे महानगरपालिका दिवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त भालचंद एकनाथ घुगे वय ५८ यांच्यावर काल हल्ला झाला. अतिक्रमण विभागाचा स्टाफ, डायघर पोलीस स्टेशनचे पोलीस, एम एस एफ चे अमलदार सुद्धा सोबत होते .शिलफाटा येथे गावदेवी मंदिरासमोर असलेला अटलांटा बिल्डिंग गेटच्या शेजारचे अतिक्रमण काढत असताना अब्दुल्ला शाह आलम खान वय २७, धंदा व्यवसाय, यांनी सहाय्यक आयुक्त भालचंद्र घुगे, अतिक्रमण स्टाफ, पोलीस, व एम एस एफ चे कर्मचारी यांना शिवीगाळ करून धमकी दिली. तसेच सहायक आयुक्त यांच्या अंगावर धावून आला. शाहआलम शहाजहॉ खान वय ६३ वर्ष, धंदा व्यवसाय, राहणार शबीस्तान मंजिल, यांनी सहाय्यक आयुक्त यांच्या मानेवर हाताने जोराचा फटका मारून मारहाण केली. आणि शिवीगाळ करून धमकी देऊन सरकारी कामात अडथळा आणला आहे. या दोन्ही इसमां विरोधात सरकारी तर्फे कायदेशीर फिर्याद शिळ डायघर पोलीस स्टेशन नमुन्यात आली आहे. दोन्ही आरोपींना शिळ डायघर पोलीसांनी ताब्यात घेतले. त्यांच्यावर १२/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १३२,१२१,(१), ३५२,३५१,(२)३(५) कलम लावण्यात आले आहे. दोन्ही आरोपींना नोटीस देऊन पाठवण्यात आले आहे अशी माहिती शिळ डायघर चे पोलीस निरीक्षक संदिपान शिंदे यांनी दिली.

## सावित्रीबाई फुले जयंतीदिनी महाराष्ट्र सदन व महाराष्ट्र परिचय केंद्रात अभिवादन



**दि.०३, नवी दिल्ली :** पहिल्या महिला शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीदिनी महाराष्ट्र सदन आणि महाराष्ट्र परिचय केंद्रात अभिवादन करण्यात आले.

कस्तुरबा गांधी मार्गावरील महाराष्ट्र सदनातील दर्शनी भागात आयोजित कार्यक्रम  ात बीड लोकसभा मतदारसंघाचे खासदार बजरंग आप्पा सोनवणे यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी निवासी आयुक्त नीवा जैन, सहायक निवासी आयुक्त डॉ. राजेश अडपावार तसेच महाराष्ट्र सदनाचे अधिकारी व कर्मचारी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

कॉपर्निकस मार्गस्थित महाराष्ट्र सदनाच्या सभागृहात आयोजित अन्य कार्यक्रमात निवासी आयुक्त नीवा जैन यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

**महाराष्ट्र परिचय केंद्रात सावित्रीबाई फुले यांना अभिवादन**

महाराष्ट्र परिचय केंद्रात आयोजित कार्यक्रमात क्रांतिज्योती सावित्रीबाई फ ुले यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र परिचय केंद्राच्या प्रभारी उपसंचालक (माहिती) अमरज्योत कौर अरोरा यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फ ुले यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थित कर्मचा- यांनीही प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

## स्पर्धांमुळे युवकांना क्षमता ओळखता येतात - न्या. पाटील

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३, अहिल्यानगर :** स्पर्धांमुळे युवकांना स्वत:च्या क्षमता ओळखता येतात. तर आकलन शक्तीला चालना मिळते. प्रत्येक तरुणांमध्ये जन्मजात ऊर्जा, सामर्थ्य क्षमता असते. त्याची ओळख युवकांना विविध स्पर्धेतून होत असते. युवकांना प्रोत्साहन दिल्यास भारताला जागतिक महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही, असे प्रतिपादन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव तथा न्यायाधीश भाग्यश्री पाटील यांनी केले. जय युवा अकॅडमी, जिल्हा क्रीडा कार्यालय, नेहरू युवा केंद्राच्या वतीने ९ ते १२ जानेवारी दरम्यान सावेडीतील कोहिनूर मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय युवा सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकीत न्यायाधीश पाटील बोलत होत्या. यावेळी जय युवाचे अध्यक्ष ॲड. महेश शिंदे, विशेष जिल्हा सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, नोटरी पब्लिक भारत सरकारचे ॲड. सुमतीलाल बलदोटा, माहेरच्या अध्यक्षा रजनी ताठे, गायत्री गुंड, ॲड. विद्या शिंदे आदी उपस्थित होते. न्यायाधीश पाटील म्हणाल्या की, युवाशक्ती ही सर्व क्षेत्रांमध्ये निर्णायक घटक आहे. युवकांनी कायद्याची देखील माहिती घेणे आवश्यक आहे. विविध स्पर्धेमध्ये सहभाग घेतल्याने युवकांमध्ये स्पर्धात्मक गुण विकसित होणार आहेत. स्वामी विवेकानंद यांना प्रेरणास्त्रोत ठेवून युवकांनी पुढाकार घेण्याचे त्यांनी आवाहन केले. ॲड. सुरेश लगड यांनी ११ जानेवारी रोजी निबंध वक्तृत्व, हस्ताक्षर, चित्रकला, लोकगीतावर आधारित समूह नृत्य, वैयक्तिक नृत्य, लोककला, पथनाट्य, मेहंदी, ब्युटी टॅलेंट शो अशा विविध स्पर्धा घेण्यात येणार असून, युवकांनी मोठ्या संख्येने राष्ट्रीय युवा सप्ताहात सहभागी होण्याचे आवाहन केले. या स्पर्धेत सहभागी प्रत्येक स्पर्धकाला प्रशस्तीपत्र तसेच विजेत्यांना पारितोषिके देण्यात येणार असल्याचे ऍड. महेश शिंदे व संकल्प शुक्ला,आमसिद्ध सोनलकर यांनी सांगितले.

## कल्याण आरटीओ कार्यालयात आप रिक्षा-टॅक्सी संघटनेचा मोर्चा



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०३, कल्याण (ठाणे) :** दि.०२ रोजी आप रिक्षा-टॅक्सी वाहतूक संघटनेच्या सर्व कार्यकर्त्यांनी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ), कल्याण येथे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांची भेट घेऊन सीएनजी बाटला टेस्टिंग सेंटर्सच्या ट्रेड सर्टिफिकेट रद्द करण्यासाठी निवेदन सादर केले.

संघटनेच्या प्रमुखांनी, सीएनजी दरवाढीविरोधात आंदोलन करणाऱ्या कल्याण रिक्षा-टॅक्सी संघर्ष कृती समितीला जाहीर पाठिंबा दिला.व आपल्या प्रमुख मागण्या मांडल्या या वेळी सौ. निलम निलेश व्यवहारे संस्थापक, आप रिक्षा-टॅक्सी वाहतूक संघटना,श्विनोद सुर्वे,संतोष वराडे,अन्सार भाई,अकिफ डोलारे निलेश मुरलीधर व्यवहारे – महाराष्ट्र उपाध्यक्ष, श्रमिक विकास कामगार संघटना हे कार्यकर्ते उपस्थित होते.

या आंदोलनाद्वारे, रिक्षा चालकांचे हित जपण्यासाठी आणि त्यांच्या समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी संघटनेने ठोस भूमिका घेतली आहे.

## उपप्रादेशिक परिवहन कल्याण च्या वतीने रस्ता सुरक्षा अभियान २०२५ चे उद्घाटन संपन्न

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.०२, कल्याण (ठाणे) :** २ जानेवारी २०२५ रोजी, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ), कल्याण येथे रस्ता सुरक्षा अभियान २०२५ चे उद्घाटन उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी रमेश कल्लूकर यांनी भूषवले. रस्ता अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या अपघातग्रस्तांना दोन मिनिटे भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.




कार्यक्रमाच्या सुरुवातीस म ोटार वाहन निरीक्षक अनिल धात्रक यांनी प्रास्ताविक भाषण केले आणि नागरिकांना रस्ता सुरक्षा अभियानात सहभागी होण्यासाठी आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष कल्लूकर यांनी कल्याण उप प्रादेशिक परिवहन अंतर्गत होणाऱ्या अपघातांवर सखोल मार्गदर्शन केले.

त्यांनी अपघात होण्याची कारणे आणि त्यावर योग्य उपाययोजना काय आहेत, यावर चर्चा केली.सदर रस्ता सुरक्षा अभियान २०२५ च्या माध्यमातून जनजागृती करत, अपघातमुक्त रस्ते आणि सुरक्षित प्रवासासाठी प्रयत्नशील राहण्याचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन मोटार वाहन निरीक्षक इंद्रजीत आमते यांनी केले.

कार्यक्रमात प्रमुख मान्यवर सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद साळवी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता गावडे, मोटार वाहन निरीक्षक सचिन आयरेकर, अनिल धात्रक, आणि इंद्रजीत आमते, कल्याण वाहतूक विभागाचे एएसआय आकाश चव्हाण, मोटर ड्रायव्हिंग स्कूल चालक-मालक आणि कर्मचारी, डीलरचे प्रतिनिधी, एनजीओ सदस्य व नागरिक उपस्थित होते.

## विंचूरच्या विद्यालयात विविध कला गुणदर्शन कार्यक्रम संपन्न !

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०३, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ कार्यक्रमांचे प्रमुख पाहुणे आप्पासाहेब हंडाळ पोलीस उपनिरीक्षक लासलगाव, पवन सुपनार पोलिस उपनिरीक्षक लासलगाव, डॉ. सुजित गुंजाळ सदस्य जनरल बॉडी रयत शिक्षण संस्था सातारा, सुनिल मालपाणी सदस्य उत्तर विभाग सल्लागार समिती अ.नगर, पंढरीनाथ दरेकर, अध्यक्ष सल्लागार समिती विंचूर,सचिन दरेकर सरपंच ग्रामपालिका विंचूर व इतर म ान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन समारंभ संपन्न झाला.

सदर कार्यक्रमाप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य देवढे एन ई यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले. कार्यक्रमाचे




प्रमुख अतिथी आप्पासाहेब हंडाळ यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा देऊन जीवनात यशस्वी होण्याचा संदेश दिला. पहिल्या दिवशी एकूण ४० कार्यक्रम संपन्न झाले.

त्यात इयत्ता पाचवी ते बारावी मधील विविध विद्यार्थ्यांनी रंगीबेरंगी कार्यक्रम सादर केले. सदर कार्यक्रम ाप्रसंगी विद्यालयाचे पर्यवेक्षक जोपळे के जी, नीलिमा शिरसाठ मुख्याध्यापिका के बी पी प्राथ. विद्यामंदिर, तसेच सर्व शालेय समितीचे अध्यक्ष व सदस्य,पालक व शिक्षणप्रेमी नागरिक विंचूर व पंचक्रोशी, पत्रकार बंधू इत्यादी मान्यवर तसेच विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन चांदे आर के, लाईफ मेंबर रयत शिक्षण संस्था सातारा, नागणे बी आर, खरात एस ए, सावळे ए वाय यांनी केले.




## सावित्रीमाई

महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांची आज म्हणजे ३ जानेवारी २०२३ रोजी १९४ वि जयंती. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी साताऱ्याजवळील नायगाव या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई तर वडिलांचे नाव खंडूजी नेवसे असे होते. त्यांचे वडील गावचे पाटील होते. ज्या काळात स्त्रियांना घराच्या बाहेर पडायचे बंधन होते, त्याकाळात सावित्रीबाईंचा जन्म झाला. असे असले तरी सावित्रीबाई मात्र निडर स्वभावाच्या होत्या. त्या लहान असतांना एका दुबळ्या मुलाचे फुले पळवणाऱ्या धटिंगणाला त्यांनी अद्दल घडवली होती तसेच त्यांच्या घरासमोरील झाडावर असणाऱ्या घरट्यातील पक्षांची अंडी खाणाऱ्या नागाला त्यांनी ठेचून मारले होते. वयाच्या नवव्या वर्षी त्यांचा विवाह महात्मा जोतीराव फुले यांच्याशी झाला. जोतीराव तेंव्हा तेरा वर्षाचे होते. त्याकाळी बालविवाहाची परंपरा होती, अगदी पाळण्यात देखील विवाह लावले जायचे. महात्मा जोतीराव फुले म्हणजे महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारक. जोतीरावांना मातृप्रेम लाभले नाही. त्यांच्या मावस भगिनी सगुणा यांनी त्यांचा सांभाळ केला. सगुणा इंग्रज अधिकाऱ्याकडे दाई म्हणून काम करायच्या त्यामुळे त्यांना इंग्रजी कळायचे. आपल्या जोतीरावने देखील इंग्रजी फाडफाड बोलले पाहिजे असे त्यांना वाटायचे. त्यांनी जोतीरावांना शिकण्यास प्रेरित केले. जोतीरावही शिकले नंतर जोतिरावांनी सावित्रीबाई यांनाही शिकवले. मुलींच्या शिक्षणाचे महत्व जाणून मुलींसाठी शाळा काढण्याचा निर्णय त्यांनी घेतला. ते नेहमी म्हणत एक मुलगी शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते म्हणून १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. या शाळेत सावित्रीबाई फुले मुख्याध्यापक म्हणून काम पाहू लागल्या. या शाळेत सुरवातीला दोन मुली होत्या वर्षअखेर या शाळेतील मुलींची संख्या ४० ते ४५ पर्यंत पोहचली. या शाळेमुळे शूद्र समजल्या जाणाऱ्या स्त्री वर्गास ज्ञानाची कवाडे खुली झाली. पण हे चांगले काम त्याकाळातील सनातनी वर्गास रुचले नाही. मुली शाळेसाठी घराबाहेर पडू लागल्याने धर्म बुडाला अशी आरोळी ठोकत या सनातनी लोकांनी सावित्रीबाई व जोतीरावांच्या या महान कार्यास विरोध केला. सावित्रीबाई फुले यांच्या अंगावर शेण गोळे फेकले. काहींनी तर अंगावर हात टाकण्याचाही प्रयत्न केला पण फुले दांपत्य डगमगले नाही. घेतलेला वसा त्यांनी सोडला नाही. कितीही विरोध झाला तरी ध्येयापासून ते विचलित झाले नाही. जिद्दी व ध्येयवादी फुले दांपत्यांनी ज्ञानदानाचे आपले पवित्र कार्य चालूच ठेवले. जोतिरावांनी काढलेल्या शाळेत फुले दांपत्य व अन्य शिक्षक जीव ओतून शिकवत. विद्यार्थ्यांशी ते एकरूप होत त्यामुळे त्यांच्या शाळेची प्रगती लक्षणीय होती. त्यांच्या शाळेविषयी पुणे ऑब्जर्व्हर या दैनिकामध्ये २१ मे १८५२ मध्ये लिहिले होते, जोतीराव फुलेंच्या शाळेतील मुलींची संख्या सरकारी शाळेतील मुलांच्या संख्येपेक्षा दहा पटीने जास्त आहे कारण या शाळेत मुलींना शिकवण्याची जी व्यवस्था आहे ती मुलांच्या शासकीय शाळेपेक्षा चांगली आहे. १८६३ मध्ये फुले दांपत्यांनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. सावित्रीबाई त्याच्या प्रमुख होत्या. १८८५ पर्यंत ३५ विधवा ब्राह्मण स्त्रिया त्यांच्याकडे आल्या. त्यांची बाळंतपणे सावित्रीबाईंनी केली. १८७४ साली काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवा त्यांच्या घरात आल्या. या काशीबाईच्या मुलाला त्यांनी दत्तक घेतले त्या मुलाचे नाव यशवंत ठेवले. यशवंतला शिकवून त्यांनी डॉक्टर बनवले. सण १८७७ साली महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला. या दुष्काळात फुले दांपत्यांनी लोकांना खूप मदत केली. त्यांनी दुष्काळग्रस्तांसाठी जेवणाखाण्याची सोय केली. सावित्रीबाईंनी केशवपन पद्धत बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करुन नाभिकांचा संप घडवून आणला. पुनर्विवाहाचा कायदा व्हावा यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. महात्मा फुलेंनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची धुरा त्यांनी समर्थपणे वाहिली. सावित्रीबाई फुले या मोठ्या साहित्यिकही होत्या. काव्यफुले व बावनकशी सुबोध रत्नाकर हे काव्यसंग्रह त्यांनी लिहिले. १८९६-९७ साली पुण्यात प्लेगने धुमाकूळ घातला होता. प्लेग या जीवघेण्या आजाराने अनेकांचा जीव घेतला. हा रोग संसर्गजन्य आहे हे माहीत असूनही सावित्रीबाईंनी प्लेग पीडितांसाठी पुण्याजवळ दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांची सेवा करु लागल्या. त्यांना आधार देऊ लागल्या. प्लेगच्या रोग्यांची सेवा करताना सावित्रीबाईंनाही प्लेगची लागण झाली त्यातून १० मार्च १८९७ रोजी त्यांचे निधन झाले. सावित्रीबाई फुले यांचे कार्य समस्त मानवजातीला भूषणावह आहे म्हणूनच जयंतीदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

# ममत्वाचा अथांग महासागर- सिंधुताई सपकाळ!



सिंधुताई सपकाळ या भारतीय सामाजिक कार्यकर्त्या होत्या. त्या विशेषतः भारतातील अनाथ मुलांचे संगोपन करण्याच्या कार्यासाठी ओळखल्या जातात. त्यांना नुकताच २०२१मध्ये सामाजिक कार्य श्रेणीत पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्या वेळोवेळी अनेक गौरवांच्या मानकरी ठरल्या. सिंधुताईंना सुमारे ७५० राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. त्यांतील पद्मश्री पुरस्कार,

महाराष्ट्र शासनाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार, पुण्याच्या अभियांत्रिकी कॉलेजचा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा अहिल्याबाई होळकर पुरस्कार, मूर्तिमंत आईसाठीचा राष्ट्रीय पुरस्कार, आयटी प्रॉफिट ऑर्गनायझेशनचा दत्तक माता पुरस्कार, सोलापूरचा डॉ.निर्मलकुमार फडकुले स्मृती पुरस्कार,राजाई पुरस्कार, शिवलीला महिला गौरव पुरस्कार, श्रीरामपूर अहमदगर जिल्हा येथील सुनीता कलानिकेतन न्यासातर्फे कै. सुनीता त्र्यंबक कुलकर्णी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा सामाजिक सहयोगी पुरस्कार, सीएनएन- आयबीएन आणि रिलायन्स फाउंडेशनने दिलेला रिअल हीरो पुरस्कार, दैनिक लोकसत्ताचा सह्याद्रीची हिरकणी पुरस्कार, प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती पुरस्कार, डॉ.राम मनोहर त्रिपाठी पुरस्कार, पुणे विद्यापीठाचा जीवन गौरव पुरस्कार आदींचा समावेश आहे.

सिंधुताईंचा जन्म आणि त्यांचे सुरवातीचे जीवन खडतर होते. त्यांचा जन्म दि.१४ नोव्हेंबर १९४७ रोजी वर्धा जिल्ह्यातील पिंप्री मेघे गावात आणि ब्रिटीश भारतातील बेरार येथील अभिमन्यू साठे या गुराख्याच्या घरी झाला. एक अवांच्छित मूल असल्याने त्यांचे नाव चिंधी- फाटलेल्या कापडाचा तुकडा ठेवले. पण हीच चिंधी अनेक फाटक्या ठिगळांना जोडते, याचा त्यावेळी कोणी विचारही केला नसेल. अत्यंत गरिबी, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि लवकर लग्न यामुळे त्यांना चौथी इयत्ता उत्तीर्ण झाल्यानंतर शाळा सोडावी लागली. त्यांचे वयाच्या बाराव्या वर्षी श्रीहरी सपकाळ यांच्याशी लग्न झाले, जे त्यांच्यापेक्षा तब्बल वीस वर्षांनी मोठे होते. लग्नानंतर त्या वर्ध्यातील सेलू येथील नवरगाव गावात गेल्या. घरी प्रचंड सासुरवास होता. कुटुंबात शैक्षणिक वातावरण नाही. जंगलात लाकूडफाटा, शेण गोळा करताना सापडलेले कागदाचे तुकडे माई घरी आणायच्या आणि उंदराच्या बिळांत लपवून ठेवायच्या. क्वचित घरी एकट्या असल्या तर त्या अभ्यास करण्याचा प्रयत्न करीत. अठराव्या वर्षापर्यंत माईंची तीन बाळंतपणे झाली. त्या चौथ्या वेळी गर्भवती असताना त्यांनी त्यांच्या आयुष्यातला पहिला संघर्ष केला. तेव्हा गुरे वळणे, हाच व्यवसाय असायचा. गुरेही शेकड्यांनी असायची. त्यांचे शेण काढता काढता बायकांचे कंबरडे मोडायचे. शेण काढून बाया अर्धमेल्या व्हायच्या. पण त्याबद्दल कोणतीही मजुरी मिळायची नाही. रस्त्यावर मुरूम फोडणाऱ्यांना मजुरी, पण शेण काढणाऱ्यांना नाही. या शेणाचा लिलाव फॉरेस्टवाले करायचे. इथे सिंधुताईंनी बंड पुकारले आणि लढा सुरू केला. त्यामुळे या लिलावात ज्यांना हप्ता मिळायचा त्यांच्या हप्त्यावर गदा आली. हा लढा जिंकल्या पण त्यांना या लढ्याची जबर किंमत चुकवावी लागली. ताईंच्या या धैर्याने गावातील जमीनदार, दमडाजी असतकर दुखावला गेला होता. जंगलखात्याकडून येणारी मिळकत बंद झाली. दमडाजीने सिंधुताईंच्या पोटातील मूल आपले असल्याचा प्रचार सुरू केला. नवऱ्याच्या मनात त्यांच्या चारित्र्याबद्दल संशय निर्माण झाला आणि पूर्ण दिवस भरलेल्या ताईंना त्याने बेदम मारून घराबाहेर काढले. गुरांच्या लाथा बसून मरतील म्हणून तशा अर्धमेल्या अवस्थेत त्यांना गोठ्यात आणून टाकले. त्या अवस्थेत त्यांना कन्या जन्माला आली. नवऱ्याने हाकलल्यानंतर गावकऱ्यांनीही हाकलले. हे लग्न फार काळ टिकले नाही आणि वयाच्या वीसव्या वर्षीच त्यांना त्यांच्या मुलीसोबत नवऱ्याने सोडून दिले.

माराने अर्धमेल्या झालेल्या सिंधुताई माहेरी आल्या, पण सख्ख्या आईनेही पाठ फिरवली. परभणी, नांदेड, मनमाड रेल्वे स्टेशनांवर त्या भीक मागत हिंडायच्या. चतकोर भाकर, उष्टावलेले एखादे फळ हाती लागेल, म्हणून रात्रभर रेल्वे रुळांच्या कडेने फिरायच्या.

एकदा जळगाव जिल्ह्यातील पिंपराळा स्टेशनवर त्यांनी आत्महत्येचा प्रयत्नही केला. पण लहान मुलीचा जीव घेतला तर पाप लागेल म्हणून मागे फिरल्या. मग पुन्हा भीक मागत पोट भरणे सुरू झाले. त्या दिवसभर भीक मागायच्या आणि रात्री स्टेशनवरच झोपायच्या. परंतु तेथे त्यांनी कधी एकटे खाल्ले नाही. स्टेशनवरच्या सगळ्या भिकाऱ्यांना बोलावून त्या मिळालेल्या अन्नाचा काला करायच्या आणि मग सर्व भिकारी एकत्र बसून जेवायचे. त्यांनी २१ वर्षांच्या ताईंना संरक्षण दिले. दोन दिवस काहीच भीक मिळाली नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांना तेथे कायम राहता येणार नाही. म्हणून शेवटी सिंधुताईंनी स्मशान गाठले.

अनाथ मुलांना सांभाळून त्यांच्या जीवनाला दिशा देण्यासाठी सिंधुताई यांनी ममता बाल सदन संस्थेची स्थापना केली. सन १९९४ साली पुण्याजवळ पुरंदर तालुक्यात कुंभारवळण या गावात ही संस्था सुरू झाली. आपली कन्या ममता हिला दगडूशेठ हलवाई संस्थेच्या माध्यमातून शिक्षणासाठी सेवासदन येथे दाखल केले आणि त्यांनी इतर अनाथ आणि बेवारस मुलांना आधार दिला. तेथे लहान मुलांना सर्व शिक्षण दिले जाऊ लागले. त्यांच्या भोजन, कपडे अन्य सुविधा यांची उपलब्धता संस्थेकडून केली जात असे. शिक्षण पूर्ण झाल्यावर येथील मुले आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होतील यासाठीही त्यांना मार्गदर्शन दिले जाते. आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण झाल्यावर या युवक युवतींना योग्य जोडीदार शोधून देणे आणि त्यांच्या विवाहाचे आयोजन करणे हे कार्यही संस्थेकडूनच केले जाते. अशी सुमारे १०५० मुले या संस्थेत राहिलेली आहेत. त्यांनी अन्य समकक्ष संस्थाही स्थापन केलेल्या आहेत त्या अशा- बाल निकेतन हडपसर, पुणे. सावित्रीबाई फुले मुलींचे वसतिगृह, चिखलदरा. अभिमान बाल भवन, वर्धा. गोपिका गाईरक्षण केंद्र, वर्धा. ममता बाल सदन, सासवड. सप्तसिंधु महिला आधार बालसंगोपन व शिक्षणसंस्था, पुणे. आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांनी आपल्या संस्थेच्या प्रचारासाठी आणि कार्यासाठी निधी संकलन करण्याच्या हेतूने प्रदेशदौरे केले आहेत. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर त्यांनी आपल्या बोलण्याने आणि काव्याने समाजाला प्रभावित केले आहे. परदेशी अनुदान मिळणे सोपे जावे या हेतूने त्यांनी मदर ग्लोबल फाउंडेशन संस्थेची स्थापना केली आहे. त्यांना महानुभाव पंथाचा अनुग्रह होता. महानुभाव पंथाच्या नियमाप्रमाणे त्यांना भुमीडाग देण्यात आला.

अशातच सिंधुताईंवर दि.२५ नोव्हेंबर २०२१ रोजी हॉस्पिटलमध्ये डायफ्रामॅटिक हर्नियाची शस्त्रक्रिया झाली. त्यांच्यावर शस्त्रक्रियोत्तर काळजी घेण्यात येत होती. पाच वर्षांहून अधिक काळ ग्रस्त असलेल्या डायफ्रामॅटिक हर्नियामुळे त्यांचे डाव्या बाजुचे फुफ्फूस व्यवस्थितरित्या कार्य करीत नव्हते. शस्त्रक्रियेनंतर त्यांची प्रकृती थोडी बरी झाली होती. तथापि, पाच दिवसांपूर्वी त्यांना फुफ्फुसाचा संसर्ग वाढल्यानंतर त्यांची प्रकृती बिघडू लागली, त्यामुळे त्यांना व्हेंटिलेटर सपोर्टवर ठेवण्यात आले होते. दरम्यान त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि दि.०४ जानेवारी २०२२ रोजी सायंकाळी ८ वाजून १० मिनीटांनी त्यांचे निधन झाले. पुणे येथील गॅलक्सी केर या दवाखान्यामध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

**!! स्मृतिदिनी त्यांच्या ममत्वाला व कार्यकर्तृत्वाला मानाचा लवून मुजरा !!**

– संकलन व सुलेखन –
कृष्णकुमार निकोडे गुरूजी
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

### उर्जा..

पवनचक्क्या देतात
अ पारंपारिक उर्जा
कौतुकास्पदप्रकल्प
उच्च तम असे दर्जा

गुन्हेगारी करी प्रवेश
गुंडाळी लाज लज्जा
फायदा करी विध्वंस
हलू पाहे पुर्जा पुर्जा

निपटू काढे कुवृत्ती
कडक सुनवा सजा
गलिच्छ राजकारण
वेळवर द्यायची रजा

कलंकित अगणित
एकजातो येतो दुजा
उजळचालते कुप्रथा
मलिन करती ध्वजा

पाळेमुळे खणू काढे
मुळीचं नाही गमजा
नवीन हे शक्ती स्त्रोत
निर्धोक करे समाजा

रोपे उपजे तुळशीची
जमीन इथली उपजा
हवा होईल नियंत्रित
मिसळा पवित्रसबजा

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# खराब हवेचा आरोग्यावर परिणाम !

मुंबई आणि परिसराच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी कमालीची घसरायला लागली आहे. गेले काही दिवस मुंबई, नवी मुंबई आणि मुंबई उपनगर या ठिकाणच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी कमालीची घसरली आहे याचा दुष्परिणाम नागरिकांवर होऊ लागला आहे. मुंबईच्या हवेत धुळीचे बारीक कण असल्याने त्याचा सर्वाधिक परिणाम लहान मुले, वृध्द नागरिक, गरोदर महिला तसेच रुग्णांवर होऊ लागला आहे. मुंबईत दम्याचे रुग्ण वाढू लागले आहेत त्यामागेही हेच कारण आहे. मुंबईतील हवेची गुणवत्ता कमी होण्यामागे अनेक कारणे आहेत त्यात प्रामुख्याने सांगता येण्यासारखे कारणे म्हणजे वाढते औद्योकिकरण, वाहनांचे प्रदूषण, वाढती बांधकामे ही आहेत. मुंबईत, रस्ते, मेट्रो, इमारती आदींचे बांधकामे सुरू असून त्यासोबतच वाहनांमधून उत्सर्जित होणारे कणही वातावरणात जमा होतात. हवेतील धूळ, कण आणि इतर प्रदूषण करणारे घटक पावसामुळे वातावरणातून बाहेर पडतात. पावसाळा संपला तरी हे कण हवेतच राहतात. मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी घसरण्यामागे देखील हेच कारणे आहेत. मुंबईच्या हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने तज्ज्ञांची समिती नेमायला हवी. या समितीने मुंबईच्या हवेचा दर्जा कसा सुधारेल याचा अभ्यास करावा त्यासाठी या समितीला परदेशातील तज्ज्ञांची मदत घ्यावी लागली तरी सरकारने ती मिळवून द्यावी कारण मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेची पातळी घसरणे म्हणजे मुंबईकरांचे आरोग्य धोक्यात येणे. मुंबईकरांचे आरोग्य टिकवायचे असेल तर हवेच्या प्रदूषणावर ठोस उपाय करावाच लागेल. दिवाळी नंतर हे वायू प्रदूषण आणखी वाढेल असा इशारा तज्ज्ञांनी दिला होता तो खरा ठरला. सरकारने दसरा, दिवाळी, नाताळ व नववर्षात वाजवल्या जाणाऱ्या फटाक्यांवर देखील बंदी घालावी कारण फटाक्यांच्या प्रदूषणाने हवा आणखी खराब होते त्याचा दुष्परिणाम शेवटी मुंबईकरानांच भोगावा लागतो. चक्रीवादळ, मुसळधार पाऊस याची माहिती जशी एस एम एस ने दिली जाते तशी दुसऱ्या दिवसाच्या संभाव्य प्रदूषण पातळीची माहिती देता येईल असे तंत्रज्ञान तयार करावे जेणेकरून नागरिक प्रदूषणापासून स्वतःचा बचाव करतील. मुंबईतील वाढत्या वाहनांवर देखील नियंत्रण आणावे, वाढत्या वाहनांमुळे देखील प्रदूषण वाढत आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी मुंबईत सम विषमचा प्रयोग करावा. नागरिकांनीही सार्वजनिक वाहनांचा वापर करावा. वाढते प्रदूषण ही खूप गंभीर समस्या आहे. ही समस्या केवळ मुंबई दिल्ली सारख्या मोठ्या शहरातच नाही आहे असे नाही तर संपूर्ण देशातच ही समस्या आहे. त्यामुळे देशातील सर्व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. वायू प्रदूषण रोखण्यासाठी सरकारने कायम स्वरुपी ठोस उपाययोजना करावेत.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## सावित्रीबाई फुले यांना जयंतीनिमित्त ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३, ठाणे :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना जयंतीनिमित्त ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी अभिवादन केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समिती सभागृहात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून जिल्हाधिकारी श्री. शिनगारे यांनी अभिवादन केले. यावेळी पुराभिलेख संचालनालयाचे अभिलेखाधिकारी मनोज हिं. राजपूत, मीरा-भाईंदरच्या नायब तहसीलदार स्मिता गुरव, मुरबाडच्या नायब तहसीलदार सुषमा बांगर, पुराभिलेख संचालनालयाचे संशोधन सहाय्यक स्वप्निल गावडे, भरत गवळी यांच्यासह अधिकारी आणि कर्मचारी तसेच महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज

# थोडक्यात

## वर्तमानात सावित्रीमाईंचे विचार कृतीतून रुजविणे हीच आदरांजली



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०३, खंडाळा (सातारा) :** खंडाळा विभाग शिक्षण समितीच्या वतीने शुक्रवार, दिनांक ०३ जानेवारी २०२५ रोजी सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त राजेंद्र शैक्षणिक संकुल आवारात अभिवादन करण्यात आले. यावेळी खंडाळा विभाग शिक्षण समिती सचिव अनिरुद्ध(संजीव) गाढवे यांच्या हस्ते सावित्रीबाईंच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी बोलताना अनिरुद्ध गाढवे म्हणाले, भारतीय संस्कृतीत स्त्री शक्तीस अनन्य साधारण महत्व असून महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी प्रतिकूल परिस्थितीशी तडजोड न करता त्यावर मात करत स्त्री शैक्षणिक क्रांतीचे कार्य सुरू ठेवले. यातूनच स्त्री सक्षम आणि बलशाली बनली. वर्तमानात स्त्री सक्षम आहे. याचे सर्वस्वी श्रेय फुले दाम्पत्यांच्या त्यागाला जाते. यासाठी सावित्रीमाईंचे विचार सर्वांनी आपल्या कृतीतून रुजविल्यास हीच खरी त्यांना आदरांजली आहे. या समारंभासाठी किसनवीर सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक व युवा नेते राहुल घाडगे, ग्रामपंचायत बावडा चे सदस्य अतुल (बाबा) पवार, खंडाळा नगरपंचायत विद्यमान नगराध्यक्ष उज्वला संकपाळ, युवा नेते प्रविण संकपाळ,राजेंद्र विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय प्राचार्य शब्बीर नालबंद, उपप्राचार्या अरुंधती गाढवे, उपमुख्याध्यापिका सुशीला मोहिते, एकता ग्रंथालय संचालक योगिता गाढवे, वरिष्ठ महाविद्यालय व कनिष्ठ विद्यालय शिक्षक, प्राध्यापक वृंद व कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

## ग्रंथ, पुस्तकांच्या वाचन आकलनात रमले विद्यार्थी





**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०३, खंडाळा (सातारा) :** खंडाळा येथील सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय ग्रंथालय विभाग व एकता ग्रंथालय व वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन संकल्प महाराष्ट्राचा सप्ताह अंतर्गत ०२ जानेवारी रोजी ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले. ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन एकता ग्रंथालयाच्या ग्रंथपाल रेश्मा यादव यांच्या हस्ते करण्यात आले. वरिष्ठ महाविद्यालय व राजेंद्र विद्यालयातील विद्यार्थ्यांनी ललित, वैचारिक, आत्मचरित्र, स्पर्धा परीक्षा, क्रीडा, इ. विषयावरील विविध ग्रंथ व पुस्तकांचे वाचन करत ज्ञानरुपी आकलन केले. या ग्रंथ प्रदर्शनासाठी वरिष्ठ महाविद्यालय ग्रंथपाल अर्चना राऊत,राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा.अमीर इनामदार, विद्यार्थी साहिल शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी एकता ग्रंथालय समिती अध्यक्ष जितेंद्र गाढवे, डॉ.प्रतिभा पाटणे, वर्गशिक्षिका योगिता इंगवले,प्रा.भारती चव्हाण, प्रा.काजल पाटील, प्रा.अस्मिता येवले, प्रा.नयना ओंबळे बीसीए,विज्ञान विभागातील विद्यार्थी-विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.

## महाराष्ट्र विद्यालय येथे आनंद मेळावा उत्साहात साजरा



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०२, नागपूर :** खापरखेडा येथील महाराष्ट्र विद्यालयाच्या प्रांगणात आनंद मेळाव्याचे आयोजन दिनांक ०२ जानेवारी २०२५ रोजी करण्यात आले. याप्रसंगी शाळेचे प्राचार्य अरुण वडस्कर, पं.स. सावनेर सदस्य अरुणा शिंदे, शाळा समिती सदस्य दामोधर हाते. सामाजिक कार्यकर्ते बबनराव भड, ग्रा.पं.चिंचोली सरपंच मीनाक्षी तागडे, शाळेचे माजी पर्यवेक्षक प्रमोद ईखे, पर्यवेक्षक पद्माकर राऊत, उपमुख्याध्यापक चंद्रशेखर लिखार, प्रा टेकाडे आदी मान्यवर उपस्थित होते. यात ५ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांनी विविध खाद्य पदार्थांसह सहभाग घेतला. आनंद मेळाव्याच्या आयोजनातून व्यापार कसा करावा, पैशाचे नियोजन कसे करावे, रोजगार कसा मिळवावा, पदार्थ तयार करून विक्री कसे करावे या विषयांचे मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळाले. याप्रसंगी उपस्थित सर्व विद्यार्थी, पाहुणे मंडळी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मेळाव्यातील विविध पदार्थांचा आस्वाद घेतला. यातून विद्यार्थ्यांना खरी कमाईची अनुभूती प्राप्त झाली. उद्घाटन कार्यक्रमाचे संचालन शाळेच्या प्रा. स्वेता रोकडे यांनी केले. मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांचे योगदान मोलाचे ठरले.

## जि.प.आदर्शमराठी शाळा वाल्मिकीनगर येथे बालिकादिन साजरा




**अक्षराज : उमेश तबिब**

**दि.०३, दापोली (रत्नागिरी) :** शुक्रवार, दिनांक ०३ जानेवारी २०२४रोजीजि.प.आदर्शमराठी शाळा वाल्मिकीनगर येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मुलींनी सावित्रीबाई यांची तर मुलांनी जोतिबा यांची वेशभूषा साकारली होती. त्यानंतर इयत्ता पहिली स्वराज चोगले, जीत कुलापकर, अरुष तबीब, वंश साठविलकर, कविश जोशी, वंश सागवेकर, तेजश्री जोशी, तन्वी पाटील इयत्ता दुसरी यज्ञेश चोगले, गितेश पाटील, सिया कुलापकर, स्वरा वाडये, आराध्या डोळस, इयत्ता तिसरी नैतिक चोगले, अर्णव तबीब, इयत्ता चौथी स्वराज किल्लेकर, रुंजी जाधव, मृण्मयी पाटील, आरोही वाडये, ऋग्वेद पावशे, प्रचिती पाटील, भूमिका कुलापकर, अस्मिता चोगले या मुलांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित माहितीदिली. शाळेचेमुख्याध्यापक विश्वनाथ बाळकू जाधव व उपशिक्षक रमेश गणपत पारधी यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर आधारित माहिती मुलांनादिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश गणपत पारधी यांनी केले. तर विश्वनाथ बाळकू जाधव यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

# लोकांच्या अडचणींचा गैरफायदा घेणार्यांची गय करणार नाही-खा.लंके यांचा इशारा




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, शेवगाव (अहिल्यानगर) :** अधिकार्यांना आपण लोकांच्या अडचणीचे तातडीने निराकरण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. ज्यांच्या अडचणी सोडल्या जाणार नाहीत. त्यांनी आपल्याशी संपर्क साधावा. आपल्या माध्यमातून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल. लोकांच्या अडचणीचा गैरफायदा घेणारा मग तो कोणीही असो त्याची गय केली जाणार नाही. असा इशारा खासदार निलेश लंके यांनी दिला.

शेवगाव तहसील कार्यालयात नुकतेच खा.लंके यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या आढावा बैठक व जनता दरबार उपक्रमात ते बोलत होते. सकाळी ११ वाजेची वेळ असताना दुपारी दीडच्या सुमारास बैठक सुरू झाली. उशीर झाला तरी अनेकजण बैठकीसाठी थांबून होते. बैठकीत विविध गावचे सरपंच, सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष, संचालक यांच्यासह सामाजिक कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती.

प्रांताधिकारी प्रसाद मते, राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे प्रदेश सेक्रेटरी अ‍ॅड.प्रताप ढाकणे, राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष हरिश भारदे, पाथर्डी तालुकाध्यक्ष शिवशंकर राजळे, सुनील रासने, वजीर पठाण, एकनाथ कुसळकर यांच्यासह विविध शासकीय विभागाचे प्रभारी अधिकारी, नागरिक, महिला उपस्थित होते.

शेवगाव शहर व तालुक्याच्या ग्रामीण भागातील अनेक नागरिकांनी खा. लंके यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या जनता दरबार उपक्रमास हजेरी लावून विविध शासकीय विभागातील आपापल्या समस्या मांडल्या. अनेकांनी निवेदनाव्दारे आपल्या समस्यांकडे खा. लंके यांचे लक्ष वेधले. यामध्ये पिण्याचे पाणी, रहदारीचे रस्ते, अतिवृष्टीचे रेंगाळलेले अनुदान, घरकूल, महिला बाल संगोपन, पुरवठा विभागाच्या ऑनलाईन रेशन कार्ड, मोफत धान्य वितरणातील अडचणी, प्राधान्य कार्ड वाटप, जमीन हस्तांतर, संजय गांधी स्वावलंबन व निराधार योजनेच्या प्रस्ताव मंजुरीबाबत संबंधित अधिकाऱ्यांची टाळाटाळ,

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व पाणीपुरवठा योजनेतील सावळ्या गोंधळाचा कारभार, जलजीवन, वीजवितरण, शेवगाव शहरातील पिण्याचे पाणी, रस्ते, दिवाबत्ती, आरोग्य, स्वच्छता, शेवगाव शहरासाठी स्वतंत्र पाणीपुरवठा योजनेच्या रेंगाळलेल्या कामासह शहराच्या विविध भागात सध्या तब्बल १० ते १२ दिवसांतून एकदा पाणीपुरवठा होत असल्याने पाणी वितरणातील अंतर कमी होऊन लोकांना किमान दिवसाआड पाणीपुरवठा व्हावा आदी समस्यांचा उपस्थितांकडून अक्षरशः पाऊस पडला.

तहसीलदार प्रशांत सांगडे, प्रभारी गटविकास अधिकारी अजित कुमार बांगर यांनी तालुक्यातील सद्य परिस्थितीचा आढावा मांडला. यावेळी खा. लंके यांनी शेवगाव बसस्थानक परिसरात झालेल्या सिमेंट कॉंक्रिट कामाची पाहणी करून अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना दिल्या.

# उजनी उजव्या कालव्यात उद्यापासून पाणी सुटणार - आ.आवताडे

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०३, पंढरपूर :** उजनी धरण पूर्ण क्षमतेने भरलेले असल्याने जादा पाणी नदीद्वारे व कालव्याद्वारे सोडण्यात येत आहे. हे पाणी मंगळवेढा तालुक्यातील गावांना उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रातील मंगळवेढा तालुक्यातील गावांना सोडण्याची मागणी पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी केली असता उद्यापासून हे पाणी सोडण्याचे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहेत.

याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात ना.विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उजनी प्रकल्पाच्या सल्लागार समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्याप्रसंगी त्यांनी हे निर्देश दिले आहेत. तसेच कालवा सल्लागार समितीची पुढची बैठक येत्या फेब्रुवारी महिन्यात घेऊन आता दिलेल्या निर्देशांची कशा पद्धतीने कार्यवाही झाली आहे. याचा त्या बैठकीत आढावा घेतला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. या बैठकीमध्ये आ.आवताडे यांनी गतवर्षी पाच पाण्याच्या पाळ्या मिळाल्याने सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा पाण्याचा प्रश्न बहुतांशी नियंत्रणात राहिला होता. त्याबद्दल त्यांनी प्रशासनाचे आणि संबंधित विभागाचे अभिनंदन केले.

आतापर्यंत सदर बैठका या पुणे, मुंबई येथे घेतल्या जात होत्या. परंतु चालू वर्षाची कालवा सल्लागार समितीची बैठक सोलापूर जिल्ह्यामध्येच होत असल्याबद्दल आ.आवताडे यांनी मंत्री ना.विखे-पाटील यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला. या बैठकीमध्ये तालुक्याच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या मागण्या मांडत असताना आमदार समाधान आवताडे यांनी सांगितले की, मंगळवेढा तालुक्यातील टेलच्या भागातील शेतकऱ्यांना पुरेसे पाणी अद्याप पर्यंत मिळत नाही ते मिळावे. अशी त्यांनी मागणी केली. शिवाय कॅनॉल ची निर्मिती होऊन २५ वर्षे झाली. कॅनॉल टेलच्या भागातील कॅनॉल ची कामेपूर्वी निकृष्ट झाल्याने अजून शेतकऱ्यांना पुरेशा दाबाने पाणी मिळत नाही.

सदर कामाची व्यवस्थित डागडुजी करून आवश्यक दाबाने शेतकऱ्यांना पाणी मिळण्याची ही त्यांनी मागणी केली. तालुक्यातील मरवडे, बोराळे डोणज, नंदुर, कर्जाळ, कात्राळ हुलजंती, ढवळस, मुढवी धर्मगाव, मंगळवेढा साखर कारखाना रोड या भागातील बहुतांश शेतकऱ्यांना आजही पाण्यासाठी झगडावे लागत आहे. त्यामुळे त्यांना पाणी मिळणे गरजेचे आहे. भीमा नदीवरील को.प.बंधाऱ्यावरील खराब झालेले दरवाजे दुरुस्तीबाबत काही नियोजन झाले आहे ? असा आ आवताडे यांनी सवाल उपस्थित केला असता संबंधित खराब झालेल्या दरवाजांपैकी जे दरवाजे जिल्ह्यातील साखर कारखान्याच्या परिसरात असतील त्या निडलची त्या-त्या संबंधित कारखान्यांनी दुरुस्ती आणि वापर योग्य करावेत असे मंत्री ना. विखे-पाटील यांनी सांगितले असता सर्वांनी त्यास सहमती दर्शवली आहे.यावेळी खा. धैर्यशील मोहिते पाटील, खा. प्रणिती शिंदे, माजी मंत्री आमदार सुभाष देशमुख, आमदार नारायण पाटील, आमदार राजू खरे, आमदार अभिजीत पाटील, आमदार उत्तम जानकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जलसंपदा विभागाचे कपोले, खांडेकर, जलसंपदा अधीक्षक अभियंता धीरज साळे, धनश्री परिवाराचे संस्थापक प्रा.शिवाजीराव काळुंगे, जकराया शुगरचे चेअरमन बिराप्पा जाधव, भारत पवार, जिल्हा लेबर

फेडरेशन माजी संचालक सरोज काझी, राजन पाटील, विक्रांत पंडित तसेच संबंधित विभागाच्या विविध खात्याचे अधिकारी पदाधिकारी उपस्थित होते.

# मुदखेड शहरात सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०३, मुदखेड (नांदेड) :** बहुजन समाज पार्टी मुदखेड शहरच्या वतीने मुदखेड येथील महात्मा ज्योतीबा फुले चौक या ठिकाणी माता सावित्रीबाई ज्योतीराव फुले यांची १९४ वी जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा ज्योतिबा फुले यांच्या फलकास पुष्पहार अर्पण करण्यात आले. नंतर सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेची पुष्पपूजा व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी त्यांच्या जिवनावर प्रकाश टाकण्यात आला. दिनांक ०३ जानेवारी १८३१ रोजी महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील एका छोट्या गावात जन्मलेल्या सावित्रीबाई फुले सामाजिक कार्यकर्त्या, कवयित्री आणि शिक्षिका म्हणून ओळखल्या जातात. स्त्री मुक्ती चळवळीत त्या सक्रिय सहभागी होत्या आणि नंतर त्या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका झाल्या.

बहुजनांच्या स्त्रिया शिकाव्यात म्हणुन सावित्री आई फुले यांनी स्वतःच्या अंगावर दगड शेण झेलले. म्हणुनच आजच्या महिला शिक्षित बनल्या आहेत कोणी पोलीस अधीक्षक तर कोणी जिल्हाधिकारी, न्यायाधीश व इतर मोठमोठ्या पदावर कार्यरत आहेत. महिला म्हणजे फक्त चूल व मुलं या पर्यंतच सिमीत होत्या. त्यांना आज शिक्षणाचा जो अधिकार मिळाला. तो सावित्रीबाई फुले यांच्या चळवळीमुळे आज महिला पोलिस अधीक्षक तर जिल्हाधिकारी तसेच न्यायाधीश झाल्या. त्या सर्वांच्या वतीने माता सवित्रीआई यांना कोटी कोटी नमन असे अ‍ॅड कमलेश चौंदते यांनी त्यांच्या जयंती दिनानिमित्त विचार मांडले. यावेळी बसपाचे जेष्ठ नेते सुभाष चौदंते, माजी नगर सेवक अ‍ॅड कमलेश चौदंते, अ‍ॅड अमोल भुरे, विशाल कापसे, बहुजन समाज पार्टीचे शहर अध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, राजु चौदंते, दिगांबर कदम, किशोर वाघमारे, सारीपुत्र भक्ते, सामाजिक कार्यकर्ता रमेश बोडके, किशोर मांडे यांसह आदींची उपस्थिती होती

# माळेगावात पारंपारिक लोककला महोत्सवात कलाकारांनी जिंकली रसिकांची मने

## लोककला महोत्सवाचे आ.प्रतापरावरा पाटील चिखलीकर यांचे हस्ते उद्घाटन



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, नांदेड :** महाराष्ट्रातल्या मातीत जन्मलेल्या कलाकारांचा सन्मान करण्यासाठी माळेगाव यात्रेत पारंपारिक कला महोत्सवाची सुरुवात केली आहे. पारंपारिक लोककलांचे संवर्धन व कलाकरांना प्रोत्साहन देणे हे आमचे ध्येय असून, कलाकारांना शासकीय अनुदान मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले. माळेगाव यात्रेत आज वैभव असलेल्या पारंपारिक लोककला महोत्सवाचे उद्घाटन आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा कृषी अधिक्षक कृषी अधिकारी ब-हाटे, पोलीस निरिक्षक संजय निलपत्रेवार, आनंदराव पाटील ढाकणीकर, शंकरराव ढगे, रोहित पाटील, सचिन पाटील चिखलीकर, नरेंद्र गायकवाड, भगवानराव राठोड, लक्ष्मण भालके, सरपंच प्रतिनिधी हनुमंत धुळगंडे, बालाजी कदम आदींची यावेळी उपस्थिती होती.

पुढे ते म्हणाले, माळेगाव यात्रेत कायमस्वरूपी सुविधा निर्माण करण्यासाठी सर्वपक्षीय बैठक आयोजित करण्यात येणार असून जिल्हा नियोजन समितीकडून भरीव निधी उपलब्ध करून घेतला जाईल, असेही ते म्हणाले. यावेळी जुन्या काळातील तमासगीर अशाताई सुकळकर, शाहीर रमेश गिरी, कलावंत लच्छु देशमुख यांचा स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन आ.चिखलीकर यांच्या हस्ते महोत्सवाची सुरुवात शाहीर रमेश गिरी यांच्या महाराष्ट्र गीतने झाली. यावेळी रघुवीर खेडकर नाट्य मंडळ, पांडुरंग मुळे नाट्य मंडळ, आनंद लोकनाट्य मंडळ, सविताराणी पुणेकर, हरीभाऊ बडे नगरकर व शिवकंन्या बडे नगरगर यांसह विविध कलाकारांनी गण गवळण, बतावणी, रंगबाजी, लावणी व इतर पारंपारिक कला सादर करून रसिकांची मने जिंकली. माळेगाव यात्रेतील पारंपारिक लोककला महोत्सवाने जिल्ह्यातील सांस्कृतिक वारशाला एक नवा आयाम दिला आहे. या महोत्सवातून महाराष्ट्रातील लोककलेचे महत्व अधोरेखित होत आहे.

# भंडारवाडीत किशोरी मुलींनी कलापथकातून दिला बालविवाह प्रतिबंधाचा संदेश

**अक्षराज : उमेश जोशी**
**दि.०३, पानगाव (लातूर) :** रेणापूर तालुक्यातील वाडी वस्ती तांड्यावर बालविवाहाचे प्रमाण कमी व्हावे. मुली बालविवाह नाकारून शिक्षणाच्या प्रवाहात रहाव्यात. म्हणून कलापंढरी संस्थेच्या पुढाकारातून गावागावात किशोरी मुलींच्या कलापथकाच्या माध्यमातून बालविवाह, बालमजूरी, प्रतिबंधासाठी पालकांना व ग्रामपंचायत प्रतिनिधींना जण जाग्रती करण्याचे काम सुरु असल्याने नुकताच भंडारवाडी येथे किशोरी मुलींच्या वतीने कलापथकाचे सादरीकरण करुन पालकांना मोलाचा सल्ला दिला. कलापंढरी सामाजीक संस्था गेल्या ३८ वर्षापासून बालकांना न्याय व त्यांचे हक्क मिळावेत म्हणून बी.पी. सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत आहे.



रेणापूर तालुक्यातील भंडारवाडी येथे नुकताच कलापंढरी संस्थेच्या वतीने किशोरी कलापथकाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आयोजीत केलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी म ाजी सरपंच भास्करराव दहीफळे होते. तर कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच सावित्रीबाई शेळके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून कलापंढरी संस्थेचे अध्यक्ष बी.पी.सुर्यवंशी, पोलीस पाटील रामराव दहीफळे, शालेय समिती अध्यक्ष महेश बरुळे, ग्राम बाल संरक्षण समिती सचिव छायाताई मगर, ग्रा. पं.सदस्य सतिष शिंदे, पोलीस कर्मचारी राजू पंडगे, आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. या कार्यक्रमांमध्ये प्रत्येक पालकांनी आपल्या मुलीचा बालविवाह न करता तीच्या पायावर उभे राहण्यासाठी पदवीपर्यंत शिक्षणाच्या प्रवाहात ठेवावे. तिच्या आवडीच्या क्षेत्रात तिला करीअर करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. बालविवाह न करता, तसेच तीला बालमजूरी ला न पाठवता शिक्षणाच्या प्रवाहात ठेवल्यास नक्कीच मुलगी तीच्या आवडत्या क्षेत्रात करीअर करुन ती तीच्या पायावर उभे टाकले. फक्त तीला पालकांनी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे, जे पालक आपल्या म ुलीचा बालविवाह करतील त्यांना होणारी कायद्याने सजा पालकांना भोगावी लागेल. बालमजूरी ला पाठवलेल्या पालकांवर होणाऱ्या कारवाई ला पालकांना सामोरे जावे लागेल.

या विषयी विविध नाटीकेतून पालकांना संदेश देण्यात आला. तसेच या नंतर देशभक्तीपर गीते, छत्रपती शिवरायांचा पोवाडा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर गिते, बालविवाह, बालमजूरी, प्रतिबंधात्मक थिम डान्सच्या माध्यमातून पालकांची जनजागृती करण्यात आली. कार्यक्रम चे सुत्रसंचलन मधुकर गालफाडे तर आभार सुप्रिया गोरे यांनी मानले. यावेळी भंडारवाडी येथील महिला, पुरुष व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्ग प्राधान्याने पूर्ण करणार - सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

**अक्षराज : जे.के.पोळ**
**दि.०३, ठाणे :** राज्यात रस्त्यांचे जाळे विकसित करून ग्रामीण भागांना शहरांशी जोडण्यात येणार आहे. याद्वारे नागरिकांना विविध सोयी – सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या कामास प्राधान्य देणार असल्याचेही सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांनी सांगितले.

सार्वजनिक बांधकाम मंत्री भोसले यांनी सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) विभागाचा पदभार स्वीकारला. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. मंत्री भोसले म्हणाले की, राज्याची सर्वांगीण प्रगती ही पायाभूत सुविधांवर अवलंबून असते. राज्यात दर्जेदार रस्त्यांचे जाळे विकसित करण्याचा शासनाचा मानस आहे. मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या कामाचा आढावा घेण्यात येणार असून, चुकीच्या पद्धतीने काम होत असेल किंवा जमीन हस्तांतरणात अडचणी येत असतील तर त्या समस्यांचे निराकरण करण्यात येईल.

मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्ग पूर्ण होणे राज्याच्या आणि जनतेच्या दृष्टीने महत्वाचे असल्याने या महामार्गाच्या कामास प्राधान्य देणार असल्याचा पुनरुच्चार मंत्री भोसले यांनी केला.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९४ वी.जयंती साजरी

**अक्षराज : चंद्रकांत भोरे**
**दि.०३, हदगांव (नांदेड) :** पंचशील प्राथमिक विद्यालय हदगाव या शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९४ वी जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष अजय नथमल काबरा, मुख्याध्यापक प्रमुख अतिथी संस्थेचे सचिव सुनीलभाऊ हरिहरराव सोनुले, संचालक जगदीश राव कदम यांच्या उपस्थितीत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले. तसेच प्रमुख अतिथींचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन अध्यक्षांनी केले.

इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंची वेशभूषा करून त्यांच्या जीवनावर आधारित जवळपास २४ चिमुकल्यांनी आपल्या शैलीम ध्ये भाषणे केली अवघ्या बालपणात सावित्रीबाई फुले यांचा नवव्या वर्षी विवाह महात्मा ज्योतिराव फुले यांच्याशी झाला.

प्रथम महात्मा ज्योतिरावांनी आपल्या पत्नीला शिक्षण दिले सावित्रीबाईंनी चूल आणि मूल ही प्रथा बंद करून मुलीसाठी शिक्षणाची दारे खुली केली व त्या भारताची पहिली महिला शिक्षिका झाल्या. समाजाचा विरोध पत्करून पुण्यामध्ये इ सन १ जानेवारी१८४८ मध्ये भिडे च्या वाड्यामध्ये पहिली मुलींची शाळा सुरु केली. त्या शिकल्या म्हणून आज सर्वच महिला पुरुषांच्या बरोबरीने सर्व कार्यक्षेत्रात कार्यरत आहेत प्रमुख अतिथी कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी आपल्या म नोगतामध्ये विद्यार्थ्यांसमोर व्यक्त केले.

कार्यक्रमासाठी देशमाने वनिता, देशमुख वंदना, कमठाणे अर्पणा, गोदावरी मोरे, स्वाती शिंगणवाड, अंजली पोलावर, पूजा जंग वाड शिक्षिका भगिनी व शिक्षक कदम, फाजगे, पद्मावार, वाघमारे,भालेराव,



शेख, जगडे, शिरगिरे, रोकडे. पवन उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इटूबोने आर.जी तर आभार प्रदर्शन जगडे एम.एम यांनी केले. चॉकलेट वाटप करून कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले

# टपाल नाका येथे महापालिकेच्यावतीने मोठी अतिक्रमण कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**
**दि.०२, पनवेल :** टपाल नाका येथे दिवसेंदिवस वाहतुकीची कोंडी वाढू लागल्याने याठिकाणी रस्ता रुंदीकरण करणे महत्वाचे होते.

टपाल नाका येथे रस्ता रुंदीकरणासाठी आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार, अतिक्रमण उपायुक्त रविकिरण घोडके व प्रभाग ड पनवेलच्या सहा. आयुक्त डॉ. रूपाली माने यांच्या मार्गदर्शनाखाली आज (दि.२) जानेवारी रोजी सहा गाळ्यांवरती निष्कासन कारवाई करण्यात आली. तसेच टपाल नाक्यावरील ८०-९० वर्षे जुनी धोकादायक, एक मजली लाकडी इमारतीवर जेसीबीच्या साहाय्याने अतिक्रमण विभागाच्या वतीने तोडक कारवाई करण्यात आली.




यावेळी उपायुक्त कैलास गावडे, सहाय्यक संचालक नगर रचना केशव शिंदे, शहर अभियंता संजय कटेकर, सहा. आयुक्त सुबोध ठाणेकर, सहा. आयुक्त श्रीराम पवार, तसेच प्रभाग अधिक्षक सदाशिव कवठे, प्रभारी अधिक्षक रोशन माळी, प्रभारी अधिक्षक अरविंद पाटील, अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. तसेच पनवेल शहर वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे, वाहतुक वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय पाटील व पोलिस कर्मचारी उपस्थित होते.

# प्रसिद्ध बॉलीवूड गायकाने गुपचूप उरकलं लग्न !

नवीन वर्षाच्या सुरुवातीला प्रसिद्ध बॉलीवूड गायक अरमान मलिक विवाहबंधनात अडकला आहे. अरमानने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर फोटो शेअर करून ही आनंदाची बातमी चाहत्यांना दिली. अरमानने त्याची गर्लफ्रेंड आशना शॉफशी लग्न केलं आहे. मागील बऱ्याच वर्षांपासून अरमान व आशना रिलेशनशिपमध्ये होते. अखेर दोघांनी लग्नगाठ बांधली असून आयुष्यातील नवीन प्रवासाला सुरुवात केली आहे.

'मैं रहूँ या ना रहूँ', 'जेहर', 'बोल दो ना जरा', 'पहेला प्यार', 'मुझको बरसात बना लो' अशा अनेक लोकप्रिय गाण्यांचा गायक अरमान मलिकने आयुष्यातील नवीन इनिंग सुरू केली आहे. अरमानने त्याची गर्लफ्रेंड आता पती–पत्नी झाले आहेत. अरमानने इन्स्टाग्रामवर लग्नातील फोटो पोस्ट केले आहेत. 'तू है मेरा घर' असं



कॅप्शन अरमानने या फोटोंना दिलं आहे. अरमान मलिकने पत्नी आशनाला टॅग करत लग्नाचे ६ फोटो शेअर केले आहेत, ज्यामध्ये ते दोघेही लग्नाचे विधी पूर्ण करताना दिसत आहेत. अरमान व आशना यांच्या लग्नातील लूकची खूप चर्चा होत आहे. आशना केशरी रंगाच्या लेहेंग्यात खूप सुंदर दिसत आहे, तर अरमानने फिकट गुलाबी रंगाची शेरवानी घातली आहे, दोघेही एकत्र खूप क्यूट दिसत आहेत. अरमानची पत्नी आशनाबद्दल बोलायचे झाल्यास ती ग्लॅमरविश्वात सक्रिय आहे. आशना एक लोकप्रिय यूट्यूबर आहे, ती फॅशन आणि ब्यूटी व्लॉग बनवते. तिचा सोशल मीडियावर लाखो फॉलोअर्स आहेत. अरमान म लिकपेक्षा आशना वयाने मोठी आहे. अरमान २९ वर्षांचा असून आशना ३१ वर्षांची आहे.

अरमान मलिकने ऑगस्ट २०२३ मध्ये त्याची गर्लफ्रेंड आशनाशी एंगेजमेंट केली होती, ज्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. त्यानंतर दोघेही २०२४ मध्ये लग्न करणार असल्याच्या चर्चा होत होत्या. पण २०२५ सुरू होताच त्यांच्या लग्नाचे फोटो समोर आले आहेत. अरमान व आशनाने त्यांच्या लग्नाची तारीख जाहीर केलेली नाही.

# थोडक्यात

## श्रीराम विद्यालयात नेहरू युवा केंद्रातर्फे तालूकास्तरीय क्रिडा स्पर्धा संपन्न

**अक्षराज : उमेश जोशी**
**दि.०२, रेणापूर (लातूर) :** श्रीराम विद्यालय रेणापूर येथे दिनांक ०२ जानेवारी २०२५ रोजी नेहरू युवा केंद्र लातूर तर्फे कबड्डी, खो–खो, धावणे, गोळाफ ेक इ. स्पर्धाचे तालुका स्तरावर आयोजन करण्यात आले होते.



जिल्हा युवा अधिकारी साक्षी समैया, लेखपाल संजय ममदापूर यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून प्राचार्य सिध्देश्वर मामडगे तर प्रमुख अतिथी म्हणून श्रीराम प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सतिष मोरे, पर्यवेक्षक अनिल कुटवाड, प्रा.भरत धायगुडे क्रिडा विभाग प्रमुख विवेक भातीकरे सांस्कृतिक विभाग प्रमुख अमृतेश्वर स्वामी, प्रा.एल. आर शेवाळे, प्रा.चंद्रशेखर मोटे, तालुका समन्वयक अविनाश दुमपल्ले यांची उपस्थिती होती. धावणे (मूली) स्पर्धेत प्रथम - सोनिया पांचाळ, द्वितीय - भक्ती येमले, तृतीय - मानवी पांचाळ, धावणे मूले - प्रथम - रमन पांचळ,द्वितीय - पवन मदने,तृतीय - आरुष झुल्फे, गोळाफेक स्पर्धेत मूली प्रथम - गायत्री राजे द्वितीय - अमृता निकम तृतीय –सोनिया पांचाळ गोळाफेक - (मूले) प्रथम - उमर शेख . द्वितीय –रमन पांचाळ, तृतीय - अखिलेश काळे –कबडी प्रथम - श्रीराम विद्यालय रेणापूर द्वितीय - वीर हनूमान क्रीडा मंडळ रेणापूर खो.प्रथम - श्रीराम विद्यालय रेणापूर - द्वितीय - प्रभात क्रिडामंडळ रेणापूर यांनी पारितोषिक पटकावले. विजेत्या खेळाडूंना ट्रॉफी व प्रमाणपत्र असं देण्यात आले आणि विजेता संघास पुढील स्पर्धा आहे जिल्हास्तरीय होणार आहेत आहे. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी क्रिडाविभाग प्रमूख विवेक भातीकरे, निलेश उगीले, सूरज अकनगिरे यांनी परिश्रम घेतले.

## पवार नगर रोडवर भीषण अपघात

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**
**दि.०२, पवार नगर (ठाणे) :** दि.०२ जानेवारी २०२५ रोजी पवार नगर येथे एक स्कूल बस आणि कारचा अपघात झाला. एम.एच ०४ एलबी ४९६९ या क्रमांकाची कार भरधाव वेगात होती. अचानक ब्रेक दाबला गेला. चालकाला अंदाज आला नाही. गाडी स्लिप झाली आणि स्कूल बसवर जाऊन आदळली. सुदैवाने स्कूल बस मध्ये शाळकरी विद्यार्थी नसल्यामुळे कोणतीही दुर्दैवी घटना घडली नाही. गाडीमध्ये एकूण ४ प्रवासी होते. त्यापैकी २ व्यक्तींना कोणतीही दुखापत झालेली नाही. परंतु ड्रायव्हर आणि डाव्या बाजूला बसलेला व्यक्ती हे दोघे मात्र गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलीस घटनास्थळी पोहोचले व त्यांनी पुढील कारवाई केली.



## खिडकीची ग्रील तुटून अडकलेल्या ७ वर्षीय मुलाची अग्निशामक जवानांनी केली सुखरूप सुटका

**अक्षराज : भानुदास गायकवाड**
**दि.०२, कल्याण (ठाणे) :** कल्याण पूर्व कोळसेवाडी परिसरात दिनांक ०२ जानेवारी २०२५ रोजी घडलेल्या प्रसंगात इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील खिडकीच्या ग्रिल तुटून, ७ वर्षांचा वंश लांडगे सुदैवाने गंभीर अपघातातून वाचला. वंश आपल्या घराच्या खिडकीत खेळत असताना खिडकीची ग्रिल अचानक तुटली. त्यामुळे तो खाली कोसळण्याचा धोका निर्माण झाला. मात्र, नशिबाने तो इमारतीच्या छताच्या एका कड्यावर अडकला. घटनेची माहिती शेजाऱ्यांनी तातडीने अग्निशामक दलाला दिली. अग्निशामक दलाने वेगाने घटनास्थळी पोहोचून अत्यंत दक्षतेने वंशची सुखरूप सुटका केली. या घटनेदरम्यान, घरात वंश एकटाच होता, ज्यामुळे त्याला अधिक धोका निर्माण झाला होता. शेजाऱ्यांच्या सतर्कतेमुळे आणि अग्निशामक जवानांच्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळली. या घटनेने स्थानिकांमध्ये खळबळ माजवली असून, वंशच्या कुटुंबीयांनी जवानांचे आभार मानले आहेत.



## जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांना पदोन्नती

**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.०३, अहिल्यानगर :** जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांना भारतीय पोलीस सेवेच्या निवड श्रेणीत पदोन्नती मिळाली. या पदोन्नतीम ध्ये राज्यातील सुमारे ९ आयपीएस अधिकाऱ्यांचा समावेश आहे. तसा आदेश राज्य शासनाच्या गृहविभागाने काढला काढला आहे. पोलीस अधीक्षक राकेश ओला हे २०१२ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत.



सलग १३ वर्षे सेवा बजावल्यानंतर आयपीएस अधिकार्यांना भारतीय पोलीस सेवेच्या निवड श्रेणीत पदोन्नती देण्यात येते. पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी यापूर्वी श्रीरामपूर, मालेगाव येथे अपर पोलीस अधीक्षक म्हणून कार्यकाळ गाजविला. नागपूर शहर पोलीस उपायुक्त, नागपूर ग्रामीण पोलीस अधीक्षक येथे कर्तव्य बजावले. सलग १३ वर्षे सेवा पूर्ण केल्याने त्यांची भारतीय पोलीस सेवेच्या निवड श्रेणीत पदोन्नती मिळाली आहे.